2 3 MAR 2021

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# होमिओपॅथी संशोधन प्रभावीपणे मांडा

## कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के : 'होमेसाकॉन २०२१' परिषदेचे उद्घाटन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

होमिओपॅथी संशोधनाचे कार्य संख्यांच्या स्वरूपात प्रभावीपणे मांडणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी होमिओपॅथिक मेडिकल कॉलेज एक्स स्टुडंटस असोसिएशन (होमेसा) ने अयोजित केलेल्या 'होमेसाकॉन २०२१ परिषदेच्या उद्घाटन प्रसंगी केले. परिषद होमिओपॅथिक वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय सभागृहामध्ये घेण्यात आली.



कोल्हापूर : होमेसाकॉन २०२१ परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. सोबत डॉ. सुनेत्रा शिराळे, डॉ. पृथ्वीराज मेथे, डॉ. राजकुमारपाटील, डॉ. धनाजी बागल, डॉ. राहुल जोशी, डॉ. रोझारिओ डिसूझा आदी.

महाराष्ट्र विज्ञान विद्यापीठ नाशिकचे होमिओपॅथी विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. धनाजी बागल म्हणाले, कोरोनावर मात करण्यासाठी होमिओपॅथीसह वैद्यकीय क्षेत्रात महत्त्वपूर्ण संशोधन सुरू आहे. यावेळी छातीरोग तज्ज्ञ डॉ. पृथ्वीराज मेथे (सांगली), डॉ. राहुल जोशी (मुंबई), डॉ. संतोष रानडे (कोल्हापूर) यांनी गुंतागुतीशिवाय कोरोना बरा होण्यासाठी होमिओपॅथी औषधाची उपयुक्तता विषद केली.

'नॅशनल कमिशन फॉर होमिओपॅथी'ची रचना, कायदा व उद्दिष्टये यासह त्याचा होमिओपॅथी औषध प्रणालीच्या विकासावर होणारे परिणाम प्राचार्य डॉ. रोझारिओ डिसोझा (गडहिंग्लज) यांनी विषद केले. दिवसभर चाललेल्या परिषदेत डॉ. मनीषा शर्मा (मुंबई), डॉ. पायल परमार (मुंबई) यांची व्याख्याने झाली.

होमेसा प्रेसिडेंट डॉ. राजकुमार पाटील यांनी स्वागत करून असो.तर्फे उपक्रमांची माहिती दिली. संयोजक सचिव डॉ. सुनेत्रा शिराळे यांनी 'कोरोना-काहीही कायमचे टिकत नाही' या परिषदेच्या संकल्पनेबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. सचिव डॉ. राजेश कागले यांनी आभार मानले. परिषद यशस्वी होण्यासाठी डॉ. हिंमतसिंह पाटील, डॉ. सुहास पाटील, डॉ. अन्वर गंजेली, डॉ. हर्षवर्धन जगताप, डॉ. शीतल पाटील, डॉ. सुधीर जरे आदींनी परिश्रम घेतले. परिषदेस सुमारे ३ हजार होमिओपॅथ ऑनलाईन उपस्थित होते.

सकाळ

# ‘होमिओपॅथी संशोधन प्रभावीपणे मांडा : डॉ. शिर्के

## होमिओपॅथिकच्या होमेसाकॉन परिषदेचे उद्घाटन

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता २२ : ‘होमिओपॅथी संशोधनाचे कार्य संख्याच्या स्वरूपात अधिक प्रभावीपणे मांडणे आवश्यक आहे,’ असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी होमिओपॅथिक मेडिकल कॉलेज एक्स स्टुडंटस असोसिएशनतर्फे (होमेसा) झालेल्या ‘होमेसाकॉन २०२१’ या परिषदेच्या उद्घाटन प्रसंगी केले. होमिओपॅथिक वैद्यकिय महाविद्यालयाच्या सभागृहात ही परिषद झाली.

होमिओपॅथसनी आयुष्यभर नवनवे शिकत राहावे व स्वतःचे वैद्यकीय ज्ञान अपडेट ठेवून संशोधनाशी नाते जोडावे. जगाच्या तुलनेत कोरोनावर अधिक प्रभावीपणे नियंत्रण करण्यात भारत यशस्वी ठरला आहे. या निमित्ताने वैद्यकीय क्षेत्रातील होमिओपॅथीसह सर्वच विभागांचे महत्त्व वाढले आहे, असेही कुलगुरू म्हणाले. कोरोनावर



डॉ. शिर्के

मात करण्यासाठी होमिओपॅथिसह वैद्यकीय क्षेत्रात महत्त्वपूर्ण संशोधन सुरू आहे, असे प्रतिपादन महाराष्ट्र विज्ञान विद्यापीठ नाशिकचे होमिओपॅथी विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. धनाजी बागल यांनी केले. डॉ. संतोष रानडे (कोल्हापूर), डॉ. पृथ्वीराज मेथे (सांगली), डॉ. राहुल जोशी (मुंबई), प्राचार्य डॉ. रोझारिओ डिसोझा (गडहिंग्लज) डॉ. मनीषा शर्मा (मुंबई), डॉ. पायल परमार (मुंबई), यांची व्याख्याने झाली. होमेसा प्रेसिडेंट डॉ. राजकुमार पाटील यांनी स्वागत केले.

यावेळी सचिव डॉ. सुनेत्रा शिराळे, सचिव डॉ. राजेश कागले, डॉ. हिम्मतसिंह पाटील, डॉ. सुहास पाटील, डॉ. अन्वर गंजेली, डॉ. हर्षवर्धन जगताप, डॉ. शीतल पाटील, डॉ. सुधीर जरे आदी उपस्थित होते.

23 MAR 2021

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

पहिल्या दिवशी ३५०२ जणांनी दिली परीक्षा : ३४३४ ऑनलाईन परीक्षार्थी

# शिवाजी विद्यापीठाच्या हिवाळी सत्रातील परीक्षा सुरू

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : शिवाजी विद्यापीठाच्या हिवाळी सत्रातील (ऑक्टोबर-नोव्हेंबर २०२०) विविध २५ अभ्यासक्रमांच्या परीक्षा सोमवारपासून सुरू झाल्या. पहिल्या दिवशी कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यांतील ३५०२ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. त्यातील ३४३४ विद्यार्थ्यांनी ऑनलाईन, तर ९४२ जणांनी ऑफलाईन पद्धतीने परीक्षा दिली.

विद्यापीठ कार्यक्षेत्रातील विविध महाविद्यालयांमध्ये सोमवारी दिवसभरात विविध सत्रांमध्ये कोरोनाबाबतच्या नियमांचे पालन करून परीक्षा सुरू करण्यात आल्या. त्यामध्ये विविध १२ अभ्यासक्रमांच्या परीक्षांचा समावेश आहे. ऑनलाईन आणि ऑफलाईन पद्धतीने या परीक्षा घेण्यात आल्या. सोशल डिस्टन्सिंग ठेवत विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. त्यासाठी एक तासाची ५० गुणांची प्रश्नपत्रिका होती. त्यामध्ये बहुपर्यायी स्वरूपातील प्रश्न होते.

दरम्यान, या सत्रातील परीक्षा देण्यासाठी सुमारे ८१ हजार विद्यार्थ्यांनी ऑनलाईन, तर ६३ हजार विद्यार्थ्यांनी ऑफलाईन पद्धतीचा पर्याय निवडला आहे.



शिवाजी विद्यापीठाच्या हिवाळी सत्रातील परीक्षांना सोमवारी प्रारंभ झाला. कोल्हापूर शहरातील कमला महाविद्यालयात सोशल डिस्टन्सिंगचे पालन करीत बी. व्होक आणि बीसीए अभ्यासक्रमाची विद्यार्थिनींनी ऑफलाईन पद्धतीने परीक्षा दिली.

विद्यापीठाच्या मार्गदर्शक सूचनानुसार आणि कोरोनाच्या नियमांचे पालन करीत हिवाळी सत्रातील परीक्षांची सुरुवात केली.
- डॉ. राजेंद्र लोखंडे, प्राचार्य, महावीर महाविद्यालय.

## अंतिम वर्षाचे वेळापत्रक दोन दिवसांत

विषयाच्या सांकेतिक क्रमांकातील तांत्रिक अडचणींमुळे विद्यापीठाने हिवाळी सत्रातील बी.ए., बी.कॉम., बी. एस्सी.सह काही अभ्यासक्रमांच्या अंतिम वर्षाच्या परीक्षा लांबणीवर टाकल्या आहेत.

तरूण भारत

# शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षांना प्रारंभ

- ३५०२ विद्यार्थ्यांनी दिली परीक्षा
- ९४९ जणांची ऑफलाईन परीक्षा

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या हिवाळी सत्रातील विविध अभ्यासक्रमांच्या परीक्षा सोमवारपासून प्रारंभ झाला. पहिल्या दिवशी एकूण ३५०२ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. त्यापैकी ३४३४ ऑनलाईन, तर ९४९ जणांनी विद्यार्थ्यांनी ऑफलाईन पद्धतीने परीक्षा दिली. परीक्षेच्या पहिल्याच दिवशी ऑनलाईन परिक्षेत कोणताही गोंधळ झाला नाही.



विविध सत्रांमध्ये कोरोनाबाबतच्या नियमांचे पालन करून परीक्षा सुरू करण्यात आल्या. त्यामध्ये बी.एस्सी. बायोटेक., आयटी., शुगर टेक., ॲनिमेशन., फॉरेन्सिक सायन्स., फूड प्रोसेसिंग ॲंड पॅक., कॉम्प्युटर सायन्स., बीसीएस., बीबीए., बीसीए., बी.एस.डब्ल्यू, बीआयडी., बीडीएससी., बीएफटीएम. आणि बी.व्होकच्या विविध १२ अभ्यासक्रमांच्या परीक्षांचा समावेश आहे. ऑनलाईन आणि ऑफलाईन पद्धतीने या परीक्षा घेण्यात आल्या. त्यासाठी एक तासाची ५० गुणांची प्रश्नपत्रिका होती. त्यामध्ये बहुपर्यायी स्वरूपातील प्रश्न होते.

**पर्याय निवडण्यास मुदतवाढ**

या सत्रातील परीक्षा देण्यासाठी सुमारे ६१ हजार विद्यार्थ्यांनी ऑनलाईन, तर ६३ हजार विद्यार्थ्यांनी ऑफलाईन पर्याय निवडला आहे. विद्यापीठ कार्यक्षेत्रात कोरोनाची रुग्णसंख्या वाढत असल्याने परीक्षा पर्याय निवडण्यासाठी मुदत वाढ देण्यात आली आहे. बुधवार (दि. २४) पर्यंत मुदत वाढ दिल्याची माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक गजानन पळसे यांनी दिली.

पुढारी



# ऑफलाईन टू ऑनलाईन पर्याय

## शिवाजी विद्यापीठाची परीक्षार्थींसाठी सुविधा

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

कोरोनाच्या वाढत्या संसर्गाच्या पार्श्वभूमीवर शिवाजी विद्यापीठाच्या वतीने ३० मार्चपासून सुरू होणाऱ्या परीक्षासाठी विद्यार्थ्यांना ऑफलाईन टू ऑनलाईन पर्याय निवडण्याची २३ व २४ मार्चपर्यंत सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. विद्यापीठ परीक्षा विभागातर्फे ऑनलाईन,ऑफलाईन परीक्षेचा पर्याय, ई-मेल आयडी व मोबाईल क्रमांक अधिविभाग, महाविद्यालयस्तरावर अद्ययावत करण्याबाबत कळविले आहे. परंतु कोव्हिड १९ चा प्रादुर्भाव, वाढत असलेली रुग्णांची संख्या विचारात घेऊन दक्षता घेणे आवश्यक आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना अधिविभाग, महाविद्यालयात जावे लागू नये म्हणून विद्यार्थी स्तरावर ऑफलाईनचा पर्याय ऑनलाईन अद्ययावत करण्याची सुविधा देण्यात आली आहे.

विद्यापीठ संकेतस्थळावर याबाबतची लिंक उपलब्ध करून देण्यात आली आहे. ज्या विद्यार्थ्यांची परीक्षा २२ मार्चपासून सुरू झाली आहे, अशा विद्यार्थ्यांना कोणताही बदल करता येणार नाही. एखाद्या बाबीचा चुकीचा तपशील भरला असल्यास महाविद्यालय, अधिविभाग स्तरावर दुरुस्तीची सुविधा उपलब्ध असल्याची माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक जी. आर. पळसे यांनी दिली.

सकाळ

# इमान राखणारे साहित्यच वैश्विक पातळीवर जाते : डॉ. शिंदे

सकाळ वृत्तसेवा

सरूड, ता. २२ : 'लेखक कलावंतांनी सामाजिक भान जपत सत्याच्या दर्शनासाठी निर्भयपणे उभे राहावे, अभावग्रस्तांच्या वेदनेला वाचा फोडणारे व वास्तवाशी इमान राखणारे साहित्यच वैश्विकपातळीवर पोहचते,' असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या मराठी विभागाचे प्रमुख डॉ. रणधीर शिंदे यांनी केले. थेरगाव (ता. शाहूवाडी) येथील राजर्षी शाहू वाचनालयाच्या राजर्षी शाहू साहित्य गौरव पुरस्कार व राजर्षी शाहू ग्रंथमित्र पुरस्कार वितरण समारंभात ते बोलत होते. माजी आमदार बाबासाहेब पाटील अध्यक्षस्थानी होते. चंद्रकांत रेडेकर यांनी स्वागत केले.

डॉ. शिंदे म्हणाले, ''थेरगावसारख्या एका छोट्याशा गावात मराठी भाषा आणि संस्कृतीच्या दृष्टीने प्रतिभावंतांचा सन्मान होणे, ही सांस्कृतिक दृष्टीने महत्त्वपूर्ण घटना आहे. वास्तवाला नेमकेपणाने भिडणे हे साहित्यिकांचे कर्तव्य आहे.''

या वेळी डॉ. संभाजी बिरांजे, डॉ. श्रीकांत पाटील, प्रा. विष्णू शिंदे, प्रा. चंद्रशेखर कांबळे, विश्वास सुतार, स्मृतीशेष बाबूराव रोकडे यांना राजर्षी शाहू साहित्य गौरव पुरस्कार देऊन गौरविले. प्रवीण महाजन, पुणे यांना राजर्षी शाहूग्रंथ मित्र पुरस्काराने गौरविले.

या वेळी रमाकांत घोलप व प्रा. प्रकाश नाईक यांची भाषणे झाली. सरपंच शीतल घोलप, उपसरपंच सपना पाटील, गणपती पाटील, प्रकाश पाटील, बी. बी. पाटील, जालिंदर रेडेकर, सर्जेराव पाटील आदी उपस्थित होते. सुभाष सुतार यांनी सूत्रसंचालन केले. शरद रेडेकर यांनी आभार मानले.